**<u>वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी संगणक अग्रिम मिळणेबाबत आवश्यक असणारी कागदपत्रे</u>**

१) अर्जदाराचा विहित नमुन्यातील अर्ज (शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०३.०२.२०१२ नुसार उपलब्ध असलेला नमुना).

२) अर्जदाराचा "सेवार्थ" प्रणालीमधून करण्यात आलेला ऑनलाईन अर्ज (Loan Status Report).

३) वैयक्तिक संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मिळणेबाबत कार्यालयप्रमुखांची शिफारस असलेले पत्र.

४) अधिकृत संगणक/लॅपटॉप विक्रेत्याची स्वाक्षरी व शिक्का असलेले दरपत्रक (Quotation with signature and stamp of authorized distributor of Computers/Laptops).

५) अर्जदाराच्या बँकेचा संपूर्ण तपशील (बँकेचे नांव, शाखेचे नांव, खाते क्रमांक, आयएफएससी कोड, शाखेचा कोड इत्यादी).

६) शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०३.०२.२०१२ मधील अट क्रमांक ७ मध्ये नमुद केल्यानुसार नमुना क्रमांक २० मधील करारपत्र.

७) अर्जदारास यापूर्वी वैयक्तिक संगणक अग्रिम मंजूर झाले नसल्याबाबतचे कार्यालयप्रमुखांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र.

८) कुटूंब प्रमाणपत्र.

९) अपत्य प्रमाणपत्र.

१०) अर्जदाराची "सेवार्थ" प्रणालीमधील वेतनचिठ्ठी.

११) अर्जदाराचे स्थायित्व प्रमाणपत्र.

१२) अग्रिमाची वसुली राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेमधून/सेवा उपदानामधून करण्यास हरकत नसल्याबाबतचे अर्जदाराचे प्रमाणपत्र.

१३) शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०३.०२.२०१२ मधील अनुक्रमांक ४ अन्वये अर्जदाराने घेतलेल्या विविध अग्रिमांची एकुण वसुली त्याच्या मासिक वित्तलब्धीच्या ५०% पेक्षा अधिक नसल्याबाबत कार्यालयप्रमुखांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र.

<u>अग्रिम मंजूर झाल्यानंतर एक महिन्याच्या आत सादर करावयाची कागदपत्रे</u>

१) वैयक्तिक संगणक अग्रिमाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर १ महिन्याचे आत वैयक्तिक संगणक खरेदी केल्याबाबतची साक्षांकित प्रती असलेली कागदपत्रे.

२) वैयक्तिक संगणकाच्या खरेदीनंतरचे नमुना क्रमांक २१ मधील वैयक्तिक संगणकाचा मेक/मॉडेल क्रमांक स्पष्टपणे नमुद केलेले करारपत्र.

३) ज्या कारणासाठी अग्रिम मंजूर केले आहे त्याच कारणासाठी अग्रिमाची रक्कम वापरल्याबाबतचे अग्रिमधारकाचे उपयोगिता प्रमाणपत्र.

४) शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०३.०२.२०१२ मधील मुद्दा क्र. १२ नुसार, वैयक्तिक संगणक खरेदी केल्यानंतर संगणकाचा विहित पद्धतीने व नमुन्यात शासकीय विमा निधीकडे विमा उतरावा किंवा नाही याबाबतचा निर्णय अग्रिमधारकाने घ्यावयाचा असल्याने संगणक खरेदी केल्यानंतर विमा निधीकडे विमा उतरविला आहे किंवा नाही ? याबाबतचे अग्रिमधारकाचे लेखी निवेदन.